



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७५ वा ❑ गुरूवार दि.२८ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## महाराष्ट्रसह अनेक राज्यांमध्ये साजरा केला जातो गणेश उत्सव

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यप्राप्ती-करीता जनजागृती व्हावी याकरीता सार्वजनिक गणेशोत्सवाची स्थापना केली. तोच उद्देश त्यावेळच्या कार्यकर्त्यांनी नजरेसमोर ठेवून धार्मिक कार्याबरोबरच समाज जागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य हाती घेतले. महाराष्ट्रासह भारतात वेगवेगळ्या राज्यात गणेश उत्सव हा मोठा उत्सव म्हणून साजरा केला जात असतो. महाराष्ट्र सरकारने गणेश उत्सवाला राज्य उत्सव म्हणून घोषित केले आहे. भारत हा सणांचा देश आहे आणि त्यापैकी एक म्हणजे गणेश चतुर्थी (गणेश चतुर्थी २०२५), ज्याला गणेशोत्सव आणि कधीकधी विनायक चतुर्थी असेही म्हणतात. हा सण भगवान गणेशाच्या जन्मतिथी म्हणून साजरा केला जातो. अडथळ्यांचा नाश करणारा आणि मंगलकर्ता मानला जाणारा गणपती हा बुद्धी, समृद्धी आणि सौभाग्याचा देव मानला जातो. गणेशोत्सव संपूर्ण भारताला एकत्र बांधतो. हा उत्सव परंपरेने साजरा केला जातो, कुठे भव्यतेने तर कुठे मिठाई आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी, पण सर्वत्र भावना एकच असते - ''गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया!'' या वर्षी गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत साजरा केला जाईल. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये गणेशोत्सवाची साजरा केला जातो. मुंबई:मुंबईचे नाव ऐकताच सर्वात आधी मनात येणारी गोष्ट म्हणजे लालबागचा राजा. येथे भव्य मंडप, भव्य मूर्ती आणि लाखो लोकांची गर्दी पाहण्यासारखी आहे. रस्त्यांवर गुंजणारा ''गणपती बाप्पा मोरया'' चा जयघोष शहराला उत्सवी बनवतो. समुद्रकिनाऱ्यावरील भव्य विसर्जन मिरवणूक ही त्याची सर्वात खास ओळख आहे.

दिल्ली : दिल्लीमध्ये गणेशोत्सव बहुरंगी स्वरूपात येतो. विविध राज्यांतील लोक त्यांच्या स्वतःच्या परंपरेने गणपतीचे स्वागत करतात. काही ठिकाणी मोठे मंडप सजवले जातात, तर काही ठिकाणी वैदिक मंत्र आणि भजनांमध्ये पूजा केली जाते. यामुळे राजधानीची बहुसांस्कृतिक ओळख आणखी मजबूत होते.

गोवा : गोव्यात या उत्सवाला चवथ म्हणतात. प्रत्येक घरात मातीच्या मूर्ती स्थापित केल्या जातात. नातेवाईकांना भेटण्याची परंपरा आहे आणि विशेषतः मिठाईंमध्ये नेवरी आणि पटोलेओ बनवले जातात. तसेच, गोव्यातील लोककला आणि नृत्य या उत्सवाला एक विशेष रंग देतात.

तामिळनाडू : तामिळनाडूमध्ये हा उत्सव विनायक चतुर्थी म्हणून ओळखला जातो. येथे, गणेश पूजेपूर्वी, माता गौरीची पूजा केली जाते. घरांमध्ये गणपतीच्या मूर्ती स्थापित केल्या जातात आणि



भक्तीगीते गायली जातात. प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात खास गोड कोझुकटाई (मोदकासारखा पदार्थ) बनवला जातो.

हैदराबाद : हैदराबादचा खैरताबाद गणपती देशभर प्रसिद्ध आहे. येथे कधीकधी ६० फुटांपर्यंतच्या मूर्ती बनवल्या जातात. भगवानांना मोठे लाडू अर्पण केले जातात, जे नंतर भक्तांमध्ये प्रसाद म्हणून वाटले जातात. येथील उत्सवात भक्ती आणि भव्यता दोन्ही एकत्र येतात.



**कव्हरस्टोरी**
सुधीर अग्रवाल, वर्धा
मो. 95615 94306


पुणे : दरवर्षी महाराष्ट्रात सर्वत्र सार्वजनिक गणोशोत्सव उत्साहात साजरा केला जातो; विशेषत: पुण्यात. कारण- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी पुण्यातूनच सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली होती. पुण्यातील मानाचे पाच गणपती आणि भाऊ रंगारी गणपती, दगडूशेठ गणपती, मंडईचा गणपती, बाबूगेनू गणपती असे इतर प्रसिद्ध गणपती हे गणेशोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरतात. दहा दिवसांच्या या गणेशोत्सवादरम्यान पुण्याच्या कानाकोपऱ्यांतून आणि बाहेरगावाहूनही भाविकांची येथे दर्शनासाठी गर्दी होते. गणेशोत्सवाचे स्वरूप काळानुसार कितीही बदलले असले तरी पुण्यातील मानाच्या गणपतींचे महत्त्व आजही कायम आहे.

पुण्याच्या गणेशोत्सवाचे स्वतःचे आकर्षण आहे. येथील प्रत्येक घरात सजावट, पारंपारिक नृत्य आणि लोकसंगीताचे वातावरण आहे. मिठाईंमध्ये मोदक आणि लाडूचे विशेष महत्त्व आहे. पुण्याचा गणेशोत्सव त्याच्या प्रतिष्ठेसाठी आणि सांस्कृतिक वारशासाठी ओळखला जातो.

कोकणातील गणेश उत्सव: कोकणातील अद्वितीय मंदिरांपैकी एक म्हणजे गणपतीपुळे. हे स्वयंभू (स्वतः प्रकट) भगवान गणेशाला समर्पित ४०० वर्षे जुने मंदिर आहे. गणपतीपुळे मंदिर समुद्रकिनाऱ्याजवळ आहे जिथे स्फटिकासारखे स्वच्छ पाणी आणि मऊ पांढरी वाळू आहे, ज्यामुळे ते एक परिपूर्ण पर्यटन स्थळ बनले आहे.

'गणपतीला गावी जायचं' या एका ओढीवर कोकणी माणूस गणेश उत्सवाची वर्षभर वाट पाहत राहतो. गणेश चतुर्थीसाठी कोकणात येऊन बाप्पाची सालाबादप्रमाणे सेवा करून तो पुन्हा कर्मभूमीकडे परत जातो.

एखाद्या कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला, असं आपण सहज म्हणतो. प्रथमपूज्य श्रीगणेशाचं स्थान आणि त्याचा महिमाच असा आहे, की सर्वांना त्याचा लळा लागतोच. कोकणी माणसाचं आणि विशेषतः मालवणी लोकांचं गणपती हे लाडकं दैवत. 'गणपती बाप्पा मोरया' हे तीन शब्द जरी उच्चारले तरी कोकणी माणसाच्या मनात त्याचा लाडका गणपती बाप्पा आकार धरू लागतो. 'चाकरमानी' हा शब्द विशेषतः बाहेरगावी (त्यातही पुणे-मुंबई इथे राहणाऱ्या) कोकणी मंडळींसाठी वापरला जातो. 'गणपतीला गावी जायचं' या एका ओढीवर कोकणी माणूस वर्षभर त्याची वाट पाहत राहतो.

कर्नाटक:कर्नाटकमध्ये गणेशोत्सवाची सुरुवात गौरी पूजेपासून होते. त्यानंतर, घरांमध्ये आणि पंडालमध्ये गणेशजींच्या मूर्ती ठेवल्या जातात. लोक मोदकम, पायसम आणि गोज्जूसारखे पदार्थ तयार करतात. बेंगळुरू आणि म्हैसूरसारख्या शहरांमध्ये सामूहिक भजन, नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

कोलकाता : कोलकातामध्ये दुर्गा पूजा हा सर्वात मोठा उत्सव असला तरी, येथे गणेशोत्सव देखील लोकप्रिय होत आहे. कुटुंब आणि समाज एकत्रितपणे मूर्ती स्थापित करतात, पूजा आणि भक्तीगीतांनी उत्सव साजरा करतात. स्थानिक कला आणि सजावट ही येथील खासियत आहे.

आंध्र प्रदेश आणि तेलंगणा:

या राज्यांमध्ये, याला विनायक चाविती म्हणतात. गावांमध्ये आणि शहरांमध्ये मूर्ती स्थापित केल्या जातात आणि भक्तीगीते गायली जातात. आंध्र प्रदेशातील कनिपकम गावातील २१ दिवसांचा ब्रह्मोत्सव उत्सव हे एक विशेष आकर्षण आहे.

गुजरात, ओडिशा आणि पश्चिम बंगाल:

गुजरातमध्ये, गणेशोत्सव घरांमध्ये आणि मंदिरांमध्ये साध्या पण भक्तीपूर्ण पद्धतीने साजरा केला जातो. अहमदाबाद आणि सुरत सारख्या शहरांमध्ये भव्य मिरवणुका काढल्या जातात. ओडिशा आणि बंगालमध्येही, पूजा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे हा उत्सव हळूहळू लोकप्रिय होत आहे.

## लायन्स क्लब संभाजीनगर वाळूजचा ३५ वा पदग्रहण सोहळा संपन्न

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर**

- लायन्स क्लब संभाजीनगर वाळूजचा३५वा पद्ग्रहण सोहळाएम्बेसडर अजंता हॉटेलयेथे दिमाखात पार पडला.या सोहळ्यातइन्स्टॉलिंग ऑफिसर लायन राहुल औसेकरयांनी नवीन कार्यकारिणीला शपथ दिली, तररिजन चेअरपर्सन लायन राधा तोरनेकरयांनी नवीन सदस्यांना शपथ दिली. यावेळीआठ नवीन सदस्यक्लबमध्ये सामील झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभीध्वजवंदनालायन प्रतिभा गुरनाळे यांनी केली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्तेदीप




प्रज्वलनकरून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली.मावळते अध्यक्षलायन ज्ञानेश्वर काळेयांनी स्वागतपर भाषणातून कार्यकाळातील अनुभव सांगितले. मागील वर्षभरातील कार्याचा आढावामाजी सचिव लायन रणजीत चव्हाणयांनी सादर केला, तर येत्या वर्षातीलआय प्रोजेक्टसंदर्भातील सविस्तर माहितीप्रोजेक्ट हेड लायन योगेश धोत्रेयांनी दिली.

नवनिर्वाचित अध्यक्ष लायन अशोक गुरनाळेयांनी सांगितले की,यावर्षीपासून आरोग्य सेवा, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक सक्षमीकरण यावर विशेष भर देण्यात येणार आहे. कार्यक्रमासमल्टीपल कौन्सिल चेअरपर्सन लायन सुनील देसरडा, लायन विवेक अभ्यंकर, झोन चेअरपर्सन लायन अश्विनी जैस्वाल, जयराज पाटील, डॉ. पंडित पळसकरयांसह इतर मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचाशाल व पुष्पगुच्छदेऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचेनिजोजनलायन दिनेश पाटील, जितेंद्र महाजन, दयाल डीडोरे,अशोक भालेकर, प्रदीप देशपांडे, अशोक जगधने, संतोष काथार यांनी केले होते. तरआभार लायन दत्तात्रय देशपांडे यांनी मानले.

## पर्यावरण पूरक श्रीगणेश ही काळाची गरज

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** - गजाननाचे महत्व भारतिय संस्कृती मध्ये फार मोठं आहे.अनंताचे महत्व आनंतच आहे ! भारताच नव्हेतर विश्वातील अनेक देशात गणेशाचे शिल्प पहायला मिळतात. तर कांही देशात राष्ट्राच्या चलनावर बाप्पाचे चित्र रेखाटलेलं पहायला मिळेल ! त्यामुळे कलेची देवता असलेल्या गणेश उत्सवात विविध कलेचं प्रदर्शन होत असते. बर्याच काळा पासून गणपती पूजनाच्या पर्वात बाजारात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या व विविध रंगात मनमोहक मुर्त्या अकर्षित करत असतात. बाप्पाच्या अकरा दिवस मनो भावे पूजन करुन अनंताचे विसर्जन जलाशयात करण्यात येते. पण पिओपी हे जलस्थरात विरघळत नाही व त्या मुर्तीला पेंट केलेले रासायनिक रंग ही पाणी प्रदूषण वाढवत असते. निसर्ग संवर्धन व पर्यावरण रक्षण या गोष्टी कडे दूर्लक्ष होत आहे ! समुद्र, नद्या, तलावातील पाणी प्रदूषण वाढते. त्याचा परिणाम जलजीवावर होतो. तसेच पाण्याच्या




स्त्रोतावर विपरीत परिणाम होत असतो.

कांही वर्षा पासून शाडू/ माती / कागदाच्या लगद्यापासून श्रीगणेशाची मूर्ती निर्माण करण्याची व ती नैसर्गिक वनस्पतीजन्य रंगात रंगवण्याची गरज आहे ! या प्रकारच्या मुर्त्या जलाषयात सहज विरघळून जातात. मातीचा उपयोग ही करता येतो. या मुर्त्या जलाषयात विसर्जन न करता छोट्या हौदात करतात. या प्रकारची लोक चळवळ चालू आहे पण त्याला अंशत: प्रतिसाद मिळत आहे. पर्यावरण पूरक मूर्ती केवळ निसर्गाचे रक्षण करत नाही तर पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ व शाश्वत भविष्य घडवण्याचा संदेश देते. परंपारा जपत निसर्गाशी सुसंगत पध्दतीने उत्सव साजरा करणे हाच खरा सांस्कृतीक विकास आहे! याचा सातत्याने प्रयत्न बाणेर-बालेवाडी भागात भगवती सेवा आश्रम व जीवन विकास सेवा या संस्थेच्या माध्यमातून केला जात आहे.यात बालेवाडी, बाणेर, पाषाण, सोमेश्वरवाडी, सुस, सुतारवाडी, महाळूंगे या भागातील एकूण १८ शाळा व कांही अपार्टमेंट मधून केले जात आहे. वरील सेवाभावी संस्थ्येच्या माध्यमातून सुमारे १९ क्विंटल शाडू माती वाटप करुन करुन मुर्तीकार प्रशिक्षका कडून कार्यशाळेचे आयोजन गणेश पूजन पर्वाच्या सुरवातीला करण्यात आले. त्यात सहभागी विद्यार्थ्यांना मुर्ती तयार करण्याचे कौशल्य निर्माण करण्यात येत आहे.पण उत्कृष्ट मुर्ती बनवणाऱ्या विद्यार्थ्यांनां प्रात्साहन पर बक्षिस देऊन सन्मानित करण्यात येणार आहे ! यात प्रामुख्याने सर्व गीरीधर राठी, प्रकाश बोकील, डॉ.श्याम कुलकर्णी, रामधनी व प्रत्येक शाळेतील शिक्षक, शिक्षिका इ.सहभागी झाले आहेत. कार्यशाळेत मूर्तीकार प्रशिक्षक सर्वश्री,श्रीकांत कुंभार, डॉ.वैजनाथ देशमूख, व्यंकट अय्यर, साताळकर यांनी सहभागी विद्यार्थ्यांनाप्रशिक्षण दिले.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - 28




अगोदरच्या २७ लघुलेखांमध्ये आपण रंग, आकार, प्रतिके, चिन्हे नंतर बारा राशी, त्यांच्या आराध्य वृक्षांसह देवता, त्यांचे स्वामी, त्यांचे प्रभावी रंग अशा विविध तपशीलांचा आढावा घेतला. वाचकहो आपण वाचत असलेली, लघुलेख मालेतील सदर माहिती अत्यंत अल्प आहे. समुद्रातून एखादा चमचाभर पाणी घेण्यासारखी ही माहिती आहे. परंतु उपलब्ध माहिती आणि तपशीलाधारे 'वास्तुशास्त्र पेंटींग' जे बनवले जाते, ते मात्र आपल्या जीवनाला आकार देणारे ठरते हे गेल्या वीस वर्षांहून अधिक काळात, "उपयोग कर्त्या व्यक्तीच्या स्वानुभवांवरून सिद्ध झालेले आहे. एका चित्रात हजार/हजारो शब्दांचे सामर्थ असते असे म्हणतात. तद्वतच एका 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये संबंधित कुटुंबाच्या जीवनाचे यश सामावलेले असतं' असं मी अनुभवांती सांगू शकतो..

प्रस्तुत लेखा द्वारे आपणांस 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये "नक्षत्र" कसे कार्य करतात? नक्षत्रांचे आराध्यवृक्ष आणि त्यांचे 'स्वामी' कशी भुमिका बजावतात? त्या नक्षत्राचे "नक्षत्र पीडाहर मंत्र", त्या नक्षत्राचा आकाश मंडळातील आकार आणि हे सारे घरक मानवाशी कसे संबंधित आहेत? मानव देखील निसर्गाचाच एक भाग असल्यामुळे त्या मानव निर्मित सृजनाला, निसर्गनिर्मित सृजनाची मदत कशी होते ? या सार्यांचं महत्व आपण पहाणार आहोत...!!

पुढील लघुलेखां मध्ये आपण २० नक्षत्रांचा "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये कसा उपयोग होतो? त्या नक्षत्र आणि त्यांच्या आराध्य वृक्षांचा आपल्या प्रकृतीशी म्हणजे मानवी प्रकृतीशी किती अनन्यसाधारण संबंध असतो? "वास्तुशास्त्र पेंटींग' आणि मानवी प्रकृती' यांचा साहचर्य संबंध असतो, हे पटायला शंका शिल्लक रहात नाही.

'वास्तुशास्त्र पेंटींग "हा आपल्या सांस्कृतिकतेशी अनन्य साधारण संबंध जोडणारा 'सुवर्ण धागा' आहे. 'वास्तुशास्त्र पेंटींग' ज्यांनी बनवून घेतले आहेत त्यांच्या कुटुंबात समृद्धी आणि सुदृढता वास करु लागले आहेत. क्रमश:.....


द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

बहिण जाऊ केली
वाड्या नाही आली
पिकेलं पानाची
पेटारी वाया गेली ||२२७||

गावाच्या गावात
सखु बहिणीचं घर
खांद्यावर कुची (टोपड)
बाळ करे येरझार ||२२८||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## मोल



**उगवतीचे रंग**

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या दिवसात खरं निरपेक्ष प्रेम दुर्मिळ होत चाललं आहे. आज आपण प्रत्येक नातं, प्रत्येक कृती पैशात मोजतो.

आईच्या मायेचं मोल काय?

मित्राच्या आधाराचं मोल काय?

देशासाठी लढणाऱ्या सैनिकाच्या प्राणांचं मोल करता येईल ?

प्रेमाचा, करुणेचा, सन्मानाचा दर लावता येईल का?

कृष्णाच्या या छोट्याशा प्रसंगातून आपल्याला जाणवतं

खरं मोल हे भावनेचं, भक्तीचं, नि:स्वार्थ देणगीचं असतं.

देवासाठी आणि जीवनासाठीही.

मोल म्हणजे पैशाने विकत घेता न येणारी ती आत्मीयता.

कारण खरं मोल हे कधीच नाण्यांच्या खणखणाटात नसतं, ते असतं माणसाच्या हृदयातल्या नि:स्वार्थ भावनेत..

मोल नेहमीच पैशांत नसतं! पैशात ते करता येतही नाही.

मोल जो जाणेल त्याच्यासाठी असतं.

ते आईच्या डोळ्यातल्या पाण्यात असतं.

ते मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असतं.

ते भुकेल्याला दिलेल्या अन्नात आणि त्याच्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या तृप्ततेत असतं.

ते मनुष्यत्वाच्या स्पर्शात असतं. धीराच्या शब्दात असतं.

प्रेमळ, आश्वासक स्पर्शाचे कधी मोल करता येईल का ?

कुसुमाग्रजांच्या कणा कवितेतील पाठीवर आधाराचा हात ठेवून लढणाऱ्या गुरुजींच्या आश्वासक स्पर्शाचं मोल होऊ शकेल का ?

जगाच्या पाठीवर या चित्रपटात एक सुंदर गाणं आहे. सिद्धहस्त कवी ग दि माडगूळकर यांचे शब्द आहेत. आशा भोसले आणि सुधीर फडके यांच्या अजरामर स्वरात हे गाणं आपल्याला ऐकायला मिळतं. नाही खर्चली कवडी दमडी, नाही वेचला दाम बाई मी विकत घेतला श्याम.

कवडी दमडी किंवा दाम म्हणजे पैसा दिला नाही. मग तरीही हा श्याम कसा विकत घेतला ? तर त्याचं उत्तर गाण्यातच पुढे मिळतं. कवी म्हणतो –

जन्मभरीच्या श्वासाइतुके मोजियले हरिनाम.

हे त्याचं मोल आहे. आणि हे मोल देऊन ज्याला विकत घेतलं आहे तो कोणी साधासुधा नाही...


हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासाचा श्रीराम... आहे.

तेव्हा मोल द्यायचं तर ते असं. आणि घ्यायची ती अमूल्य वस्तू !

''पैशाचे मोल संपतं, वस्तूचे मोल कमी होतं, पण प्रेमाचं, श्रद्धेचं आणि विश्वासाचं मोल कधीच कमी होत नाही.''

खरं मोल हे पैशानं नव्हे, तर भावनेनं मोजायचं असतं. प्रश्न फक्त एवढाच आहे आपण आपल्या नात्यांत आणि कृतींमध्ये अजूनही 'मोल' शोधतो ते नाण्यांत की नि:स्वार्थ प्रेमात ?''

आपल्या जीवनातलं खरं मोल काय याचं उत्तर आपणच स्वत:ला द्यायचं आहे.''



**दासबोध स्तवन**



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## शुध्दज्ञान निरूपण

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी ग्रंथतर श्रेष्ठ आहेच. पण त्यापेक्षा संस्कृत ग्रंथ जास्त श्रेष्ठ आहेत कारण संस्कृत भाषा ही ''देववाणी'' भाषा आहे. वेदांच्या पेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. कारण वेदांचे सारें रहस्य वेदांतामध्ये प्रगट झालेले आहे.


अशा वेदांताच्या जो तात्पर्यार्थ आहे आणि जो अत्यंत खोल परमार्थ आहे . अतिशय खोल आणि अर्थगंभीर असे जर काही असेल तर तेसद्गुरूंचे वचन होय.

त्यावचनाने निश्चित पणे समाधान मिळते. सद्गुरूचे वचन तोच खरा वेदांन्त तोच खरा सिध्दांत होय. ते खरे अनुभवलेले ज्ञान होय. सद्गुरूच्या चरणांशी सतत ''दास''म्हणून राहिले पाहिजे.

स्वतः जर परमात्म स्वरूप आहे आत्मज्ञानाचे सर्वांगाने वर्णनं केले. सद्गुरूशी अनन्य होऊन ते ज्ञान प्राप्त होते व पूर्ण समाधान मिळते. ''अहं ब्रम्हास्मि'' हे महावाक्यांमध्ये सर्व समाधान मिळते.यात गुरू व शिष्य एकरूपहोऊन जातात. शिष्या, या महावाक्यातील मर्म समजून घे. तू स्वत: ब्रम्ह आहेस. यात संशय धरू नकोस. समर्थानी भक्तिचे न ऊ प्रकार सागितलेत। आत्मनिवेदन. हा त्यातला मुख्य

प्रकार आहे।विश्व निर्माण होते त्यावेळी ही पंचमहाभूत क्रमाक्रमाने निर्माण होतात पण विश्व अशाश्ववत आहे, तर कल्पांताच्या वेळी ते नाश पावते. तेव्हापासून ही पंचमहाभूते ज्या क्रमाने निर्माण होतात, त्याच क्रमाने लय पावतात. येवढेच नाही तर अखेर उरणारी दोघे प्रक्रुती आणि पुरूष ती देखील परब्रम्हात विलीन होतात. जर सर्व द्रुष्यवस्तू नाशपावल्या म्हणजे मी पणाने वावरणारा मी देखील उरत नाही. कारण मुळांतच परमात्मा एकरूप असल्याने दुसरे काही कॣा लागत नाही. **(क्रमशः)**

## नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे.



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, 'मुलाचे प्रेम कसे येईल?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा, 'मुलाचे प्रेम कसे येईल ' हा प्रश्न करण्याऐवजी, 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर ' नामाचे प्रेम कसे येईल ' असा करण्याऐवजी, ' मुखी नाम कसे येईल ' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वत:चीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरुवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वत:चाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, ' प्रेम का येत नाही ? ', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, ' नाम घेत नाही म्हणून. ' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण ' प्रेम का येत नाही ? ', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वत:ला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे.

आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात ' मिळविण्यापेक्षा ' मिळविलेले ' टिकविणे ', हेच जास्त कठीण आहे. ज्याला ' मी काही तरी झालो ' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

७. नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

मनाचा मृत्यू म्हणजे समाधी ही व्याख्या आपण पूर्वी ऐकलेली आहे ज्यावेळेस प्राण उर्ध्वगामी होतो मन जवळपास संपल्यात जमा असते मी तू पणाची जाणीव उरतच नाही बुद्धीही कुंठीत होते आणि अहंकार लीन असतो त्यावेळेसच अविद्येचे मळभ संपल्या जाते. सूक्ष्म स्तरावरील विकारांचे जमाव नष्ट केले जातात. योगाग्नीने शरीरात अग्नि तांडव सुरू केलेले असते. यामध्ये पापांची किल्मिशे जळून भस्म होतात. मन निष्पन्द असते. जाणीव तर असते पण ती कोणाला येते याविषयी शब्दात मांडणे अवघड जाते. अशा वेळेस आत्मा पुन्हा तेजपुंज स्वरूपात बुद्धीवर प्रकाश टाकतो म्हणून हृदयस्त परमात्मा म्हणजेच आत्मा हा तेजोमय रीतीने लकाकला आहे, त्या तेजाचे वर्णन ज्ञानेश्वर माऊली येथे असे करीत आहेत.

साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा

साधनेच्या निम्नस्तरावर भगवंताचे सगूण रुप दर्शन होत असते. या सगुणाच्या दर्शनानंतर त्याची साधना निर्गुण निराकार परमात्म्याच्या अनुभव घेण्यासाठी पुढे सरकते. यानंतर ज्ञानप्राप्ती म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. हा निर्गुण निराकार परमात्म्याचा अनुभव आहे. आत्मा व परमात्मा हे एकच आहेत हे आता जाणवते.

ही साधना ज्ञानानंतर पुढे सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ करून नंतर निर्वी कल्प समाधीकडे झेप घेते. या निर्वी कल्प समाधीत एक उच्चतम अनुभव आहे. तो म्हणजे महा शून्याचा. हा महा शून्याचा अनुभव, करोडो करोडो लोकांमधून एखाद्याच भाग्यवंतास अनुभवता येतो.

आपल्या भोवती काहीही नाही. केवळ निर्वात पोकळी आहे. खूप अंधकार दाटलेला आहे. या पोकळीचा आदी अंत कुठेच लागत नाही.हे केवळ जाणवते. पण देह भावांना पूर्णपणे संपलेली असते. मन हे जवळपास मेल्यात जमा असते. विचार नसतातच फक्त या निर्वात पोकळीचा अनुभव घेणारा कोणीतरी आहे. त्यास अनुभव येत आहेत असे भासते. ही समाधीची प्रगाढ अवस्था आहे. यात साधक बऱ्याच वेळेस बाहेर कसे पडावे हे त्याला कळत नाही. या समाधीत अखंड अमर्याद महानंद मिळत असतो.

सर्वत्र अंधकार दाटला आहे. निर्वात पोकळी आहे, आणि काहीही नाही हा निर्गुण निराकार परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव असतो.अनाहत नादाच्या साथीने सद्गुरु शिष्यास यातून बाह्य जगतात परत आणतात व लोक कल्याणाची कामे करण्यासाठी त्यास उपदेश करतात.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे
सगुण निर्गुण एक गोविंद रे

हा सगुणा पासून निर्गुणा पर्यंत आणि निर्गुणात येताच महा शून्याचा महानुभव माऊलींनी घेतला व त्यांचा आत्मा हाच परमात्मा आहे यांचे विषयी त्यांचा निश्चय झाला. ही अवस्था त्यांच्या असा साधनेने परिपुष्ट झाली व त्यांच्या उपादेय हृदयात रखुमाईचा पती तो परमात्मा स्थिर झाला. हा परमात्मा अनेकांना केवळ मुर्तीतच

आहे असे वाटते ही उफराटी कळा म्हणजे चुकीची बाजू आहे असे माऊली म्हणतात.

असे अनुभव जेंव्हा मनात शब्दच नाहीत अशा अवस्थेत मांडले आहेत. हे कोणत्या शब्दात मांडता येतील हे किती कठीण काम आहे ?तरीही माऊलींचे सामर्थ्य इतके की त्यांनी चपखल शब्दात हे दिव्य अनुभव मांडलेले आहेत.

या ज्ञानियांच्या राजास गुरु, महाराजांस विनम्रपणे अभिवादन करून हा लेख इथे संपवितो.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

४८. मायमहाकालीनमन
विकराल रूप काली। गळां नरमुंड घाली।
भय गगन पाताली। धडधडा माय चाली।।
बहिर्जिव्हा दिगंबरा। विमुक्त केशसंभारा।
शंखहस्ता गदाधरा। सहवेना भार धरा।।
नीलांगी नीलनयनी। रक्षरूधीरप्राशिनी।
रक्षोन्मादविमर्दिनी। भयंकरा संघर्षिणी।।
कवींद्रवरदायिनी। महाकालेश भामिनी।
हासदुःखनिवारिणी। दक्षसज्जनरक्षिणी।।
४९. शुभ्रांबरी प्रिय असे
निमित्तमात्राइतुके कारण पै माझे नसे।
अक्षरे यात्रा भावूके माय भरविते असे।।
ओंजळीत रसपुष्पे माझिये स्वयेचि नसे।
गंधवती वसुंधरा अनिलाचे काय असे।।
कुसुमांचिया मकरंदे भ्रमराचे काय असे।
भक्ताचिये मनछंदे भ्रामरी गे माय असे।।
शाकाचिये रसगुणे शाकंभरी माय असे।
चंद्रहासा नाही उणे शुभ्रांबरी प्रिय असे।।

## ॥ श्री राम कथा ॥



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

एखादा पांथस्थ रात्रीपुरता आपल्या घरी राहिला तर त्यास शरण आला म्हणत नाहीत. शरण आला तर त्यास आसरा देणे व त्याचे रक्षण करणे हे दोन्ही असेल तरच म्हणतात.

बिभीषणाने गाय मंदिरात घुसली म्हणून एक गवताची काडी फेकली व ती गाय मेली. लोक त्यास देह दंड देत होते. राम म्हणाले हा मला शरण आला आहे याच्या जीविताचे रक्षण ही माझी जबाबदारी आहे तो जे कर्म आता करील त्याची जबाबदारी उत्तरदायित्व माझे असेल.त्या मुळे ती शिक्षा मला द्या.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

स्वार्थ केला रघुपती मति माझी यापुलिशी करावी सकळत यजुनी भावे कास तुझी धरावी समर्थांची गोड करुणाष्टके. यात आपण शरण जाण्याची गोड करुणाष्टके आहेत.अशी शरणागती आपण का घ्यावी याची ३ कारणे आहे. हा विचार मी मानसं शास्त्राने केला आहे. १. आपल्या जीवनात निर्माण झालेल्या दुःखाची जाणीव. २. हे दुःख आपण आपल्या प्रयत्नाने दूर करू शकत नाही याची जाणीव हवी. ३. संसार नावात दुख आहे हे कळाले पाहिजे. संसारातील दुःख बद्दल आपण बोलत नाहीत. संसार या नावाने असणाऱ्या दुःख याची गोष्ट करीत आहोत.

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

**(क्रमशः)**



## आरोग्य संजीवनी

# दम लागणे....

**ज्योतिर्मय साहित्य**

१०० पाऊले चालली तरी दम लागतो? श्वास फुलतो, पाय दुखतात? खा ५ पदार्थ- वाढेल झटपट एनर्जी.....

बऱ्याचदा चार पायऱ्या किंवा टिचभर जागेवर धावलं की दम लागतो, श्वास फुलतो. जर तुमच्यासोबतही असं घडत असेल तर, नक्कीच आपल्या शरीरात स्टॅमिनाची () कमतरता असू शकते. खरंतर स्टॅमिना ही आपल्या शरीरातील उर्जा असते. जी शारीरिक आणि मानसिकरित्या शरीराला मजबूत करते.

सध्या लोकांची जीवनशैली बिघडत चालली आहे. शिवाय काही लोकं डेस्कवर तासंतास बसून काम करतात. सकस आहाराचे सेवन न करणे, व्यायामाचा अभाव यामुळे शरीरात गंभीर आजारांचा शिरकाव होतो. विशेष म्हणजे स्टॅमिना कमी होतो. अशा स्थितीत काही वेळ काम केल्यानेही शरीर थकते. जर आपल्यालाही स्टॅमिना वाढवायचा असेल तर, आहारात काही पदार्थांचा समावेश करणं गरजेचं आहे.

सुकामेवा...

ऑन्ली माय हेल्थ या वेबसाईटनुसार, ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने आपला स्टॅमिना वाढू शकतो. नट्समध्ये फायबर, हेल्दी फॅट्स, प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स असतात. शिवाय त्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सचे प्रमाणही अधिक असते. ज्यामुळे स्टॅमिना तर वाढतेच शिवाय ब्लड सर्क्युलेशन देखील सुधारते.

ब्राऊन राईस...

व्हाईट राईसच्या तुलनेत ब्राऊन राईसमध्ये स्टार्च कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. एक वाटी ब्राऊन राईस खाल्ल्याने पोट दीर्घकाळ भरलेले राहते. शिवाय त्यात कार्बोहायड्रेट असते. ज्यामुळे मसल्स मजबूत आणि स्टॅमिना वाढते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

केळी...

केळ्यामध्ये मॅग्नेशियमचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे शारीरिक उर्जा तर वाढतेच. शिवाय स्टॅमिना वाढण्यास देखील मदत करते.

पालेभाज्या...

स्टॅमिना वाढवण्यासह निरोगी आरोग्यासाठी आहारात पालेभज्यांचं सेवन करणं गरजेचं आहे. पालेभाज्यांमध्ये फायबर, व्हिटॅमिन यासह इतर पौष्टीक घटक असतात. शिवाय त्यात आयर्नचे प्रमाणही जास्त असते. ज्यामुळे कमजोरी दूर होते. शिव्या स्टॅमिना वाढवण्यास मदत करते. नियमित पालेभाज्या खाल्ल्याने आपल्याला दिवसभर काम करण्याची उर्जा मिळते.

सफरचंद... – सफरचंद आरोग्यासाठी उत्तम मानले जाते. यात कार्बोहायड्रेट्स, फायबर, लोह, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यामुळे आपल्याला फ्रेश उत्साही वाटते.

सिडको परिसरात लवकरच शुभारंभ....
एक छान लोकेशन जिथे आपण --
▪ बर्थडे पार्टी ▪ रिसेप्शन ▪ किटी पार्टी
▪ कॉन्फरन्स मिटिंग ▪ गेट - टू - गेदर
▪ सांस्कृतिक कार्यक्रम ▪ प्रकाशन समारंभ
▪ डोहाळ जेवण ▪ भिशी पार्टी व इतर...
हे व असे बरेचसे कार्यक्रम करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. एसी हॉल, लॉन, गार्डन, केटरिंग व्यवस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, साउंड सिस्टीम सर्व व्यवस्था एकाच ठिकाणी
विशेष : - प्रसन्न वातावरण - सुलभ पार्किंग व्यवस्था - सौजन्य सेवा - मध्यवर्ती ठिकाण - अगदी किफायतशीर दरात
सिद्धिविनायक
▪ हॉटेल ▪ लॉन ▪ इव्हेंट
संपर्क : 7498560019, 7588803314
Email phulambrikarrajendra@gmail. com


# एका डोळ्याची झोप



**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

असा मला लहानपणी कधीतरी प्रश्न पडला होता. आता मात्र वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्यात तसं माझ्या आठवणींच्या संदुकीतून म्हणींच्या आठवणी बाहेर पडू लागल्या. मला लहानपणी पडलेले प्रश्न जे विरुन गेले होते ते मला कधी आठवले? तर माझ्या लहानग्यानं असेच प्रश्न मला विचारले तेव्हा. मग शब्दांचा आणि अर्थांचा संबंध खरंच असतो का? हा प्रश्न मला पडला.

बोली भाषा जशी वळण पडेल तशी तयार होते आणि कृष्णाच्या असं का या मालेतील अनेक प्रश्नांपैकी एखादा बाळबोध प्रश्न ठप्पकन आपल्या समोर येतो आणि मग आपल्याला कळेनासं होतं की याचं उत्तर काय द्यायचं? डोळा लागणे हा त्यातलाच एक शब्दसमुच्चय आहे ना? थोडक्यात बोलण्याची पद्धत म्हणा किंवा वाक्प्रचार. त्याचक्षणी मला आठवल्या त्या म्हणजे रॉय किणीकर यांच्या ओळी.

''घे शब्दकोश ई ईश्वर शोधून काढ.
तो आत्मा दडला कुठल्या शब्दाआड
अर्थाला असते बंधन का शब्दांचे
कोसळून पडले इमले अक्षरतेचे।।'

या ओळींमध्ये किणीकरांनी अक्षरांची अपूर्णता मांडली आहे. कुठल्याच शब्दाआड सत्य लपलेलं नाहीये तर ते शब्दांच्या पलीकडले आहे. असेच सारे खेळ कृष्णा-वैष्णवीसारख्या मुलांच्या प्रश्नांमध्ये आहेत.

माझ्या एका डोळ्याने झोपण्याच्या घटनेवरून घडलेल्या या छोट्या गमतीशीर संवादातून एक गोष्ट स्पष्ट होते . बालकांच्या मनात भाषा शब्दशः समजली जाते. आपल्याला वाटतं आपण स्पष्ट बोलतोय, पण त्यांच्या नजरेतून ते काहीशा वेगळ्याच अर्थाच्या वाटा चोखाळणं चालू असतं.


त्यामुळेच असं का? असा प्रश्न जेव्हा जेव्हा मुलांच्या मनामध्ये निर्माण होतो तेव्हा तेव्हा ते समजून घेणं आपलं कर्तव्य आहे आणि मग आपली जबाबदारी काय आहे?


शब्दांना अर्थ देणं नव्हे, तर अर्थांच्या मागचे शब्द समजून घेणं हीच आपली खरी जबाबदारी आहे.

भाषेच्या या प्रवासात, पालकत्व म्हणजे फक्त उत्तरं देणं नव्हे तर सोबतीने शोध घेणं आहे. कारण प्रत्येक 'असं का?' हा प्रश्न त्याच्या पाठीमागे लपलेल्या भावविश्वाची खिडकी उघडतो. अशा वेळी, केवळ ज्ञान नव्हे, तर समजूतदारपणाही गरजेचा असतो. म्हणूनच ''असं का?'' हे केवळ एक शीर्षक नाही, तर मुलांच्या दुनियेत डोकावण्याचं, त्यांचं भान ठेवण्याचं आणि त्यांच्यासोबत भावनिक भाषेचा सेतू बांधण्याचं एक सुंदर निमित्त आहे.



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

## मैत्रीपर्व : गुरुदेव, स्वामी विवेकानंद आणि योगी अरविंद

पुढे त्यांनी वंदेमातरम या इंग्रजी दैनिकाचे संपादन केले आणि विविध विषयांवर लेखन करून बंगाली तरुणांमध्ये नवचैतन्य जागृत करण्याचे कार्य केले. त्यांचा कोणताही गुन्हा नसताना इंग्रजांनी त्यांना एका बॉम्ब हल्ल्याच्या खटल्यात गोवले होते. त्यातून दोषमुक्त झाल्यानंतर ते परागंदा झाले. पण ते पळून वगैरे गेले नव्हते तर त्यांनी पाँडेचेरीला प्रयाण केले आणि तेथे जवळपास ४० वर्षे योगसाधना केली आणि त्यातून अध्यात्मातील एका उच्च अवस्थेपर्यंत त्यांचा प्रवास झाला. इथेच गुरुदेवांची आणि त्यांची पुन्हा भेट झाली यावेळी गुरुदेव परदेश दौऱ्यासाठी निघाले होते परंतु त्यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांनी विश्रांती घेण्याचे ठरवले आणि त्यादरम्यान योगी अरविंद यांची भेट घेण्याचे निश्चित केले. त्या काळात योगी अरविंद आपल्या ध्यान साधनेमुळे कोणालाही भेटत नव्हते. योगी अरविंद यांच्या फ्रेंच शिष्य मीरा अल्फासा त्यावेळी आश्रमाचे काम पाहत होत्या. त्यांना माताजी म्हणून सर्व ओळखत होते. गुरुदेवांनी त्यांच्याशी संपर्क साधला आणि योगी अरविंद यांच्या भेटीची विनंती केली. रवींद्रनाथ आपली भेट घेऊ इच्छित आहेत हे कळल्यानंतर योगी अरविंद यांनी आपले सर्व नियम बाजूला ठेवून गुरुदेवांची भेट घेतली. योगी अरविंदांकडे पाहिल्यानंतर पहिल्याच दृष्टिक्षेपात गुरुदेवांना त्यांच्या उच्च अध्यात्मिक साधनेची जाणीव झाली. त्यांनी इतर योग्यांप्रमाणे आपल्या देहाला क्लेश दिले नव्हते तर त्यांच्या चेहऱ्यावर शांत आणि सौंदर्यपूर्ण असे हास्य आणि तेज विराजमान होते. एका योग्याची ती तेजस्वी मुद्रा होती. त्यांची ती आत्मसाक्षात्कारी अवस्था पाहिल्यानंतर गुरुदेवांनी त्यांना अरविंद रोबिंद्रेर लह नमस्कार ( हे अरविंदा, तुला रवींद्रचा नमस्कार असो ) असे मनातल्या मनात म्हटले आणि त्यांचा निरोप घेतला. योगी अरविंद गुरुदेवांच्या कवितांचे चाहते होते. त्यांनी गुरुदेवांना साक्षात्कारी कवी म्हटले आहे. स्वामी विवेकानंद योगी अरविंद आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर या तिघांनाही हे माहिती होते की राजकारण हा काही मानवाच्या विकासाचा आणि कल्याणाचा मार्ग नाही माणूस घडवणे हे महत्त्वाचे आहे आज माणूस जाणिवेच्या ज्या पातळीवर उभा आहे त्यापेक्षाही अधिक पुढच्या पातळीवर किंवा पायरीवर गेल्याशिवाय त्याला पुढील गोष्टी नीट दिसणार नाही किंवा परिस्थितीचे योग्य आकलन होणार नाही याबाबत या तिघाही महामानवांचे एकमत होते असे दिसते. हेच त्यांचे मोठेपण आहे.



## अण्णासाहेब मगर महाविद्यालयात महिला सक्षमीकरण व सबलीकरण कार्यशाळा

**ज्योतिर्मय साहित्य**

**सासवड** – पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महिला सक्षमीकरण व सबलीकरण' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शामल दिदी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे होते.

स्त्रियांच्या जीवनातील गुंतागुंत लक्षात घेतली तर सर्वात जास्त ताणतणावाला तिला सामोरे जावे लागते. स्त्रियांकडे उपजत असणाऱ्या प्रतिकार क्षमतेमुळे त्या कठीण परिस्थितीला तोंड देत असतात. कुटुंब, समाज व राष्ट्र यांच्या निकोप वाढीसाठी महिलांचे जीवन ताणतणावविरहित असावे. त्यातून महिला सबलीकरण व सक्षमीकरण साध्य होईल. असे प्रतिपादन प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शामल दिदी यांनी केले.

महिला सबलीकरणात शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षणाच्या माध्यमातून स्त्री आर्थिक स्वावलंबनामुळे ती स्वतःचे निर्णय घेऊ शकते. आरोग्य आणि पोषण याची जाणीव तिला सक्षम बनवते. प्रत्येक स्त्रियांना क्षेत्रात समान संधी मिळाली पाहिजे. असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी व्यक्त केले. शामल दिदी यांनी ताणतणावाचे व्यवस्थापन, डॉ. सविता कुलकर्णी यांनी आत्मविश्वास आणि स्वओळख, प्रा. संगीता देवकर यांनी भावनिक बुद्धिमता, प्रा. मनीषा गाडेकर यांनी सायबर सुरक्षितता कायदेशीर ज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. शशिकला वाल्मिकी व डॉ. निताकांबळे यांनी गटचर्चा घडवून आणली. या कार्यशाळेत ३०० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. शुभांगी औटी, डॉ. प्रशांत मुळे, प्रा. अनिल जगताप, प्रा. जयश्री अकोलकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आरती पवार व डॉ. वंदना सोनवले यांनी केले तर आभार प्रा. शैलजा धोत्रे यांनी मानले.

## रोग निवारणाच्या पर्यायी उपचारात्मक पद्धतींचा वापर गरजेचा-डॉ.पंडित शेळके



**ज्योतिर्मय साहित्य**

**सासवड** – पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे महाविद्यालय सासवड येथे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासाठी कपिंग थेरपीचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. पंडित शेळके यांनी ''स्वतःचे आरोग्य जपण्यासाठी आधुनिक उपचार पद्धतींसोबतच पर्यायी उपचारात्मक पद्धतींचा वापर समाजाने केला पाहिजे. तसेच ग्रामीण भागात विविध उपचार पद्धती पोहचविणे ही आपली जबाबदारी आहे.'' असे मत व्यक्त केले.

पाठीचे दुखणे, स्नायूंचे व गुडघे दुखी स्नायूंवरील ताण, निद्रानाश, रक्तवाहिन्या फुगुन झालेल्या नसांतील गाठी आदी संबंधित आरोग्य समस्या असलेल्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी सदर शिबिराचा लाभ घेतला. शिबिरात ड्राय कपिंग, वेट कपिंग, मोक्सा कपिंग, फंक्शनल कपिंग, मसाज कपिंग आदी विविध प्रकारांची माहिती देऊन प्रत्यक्ष उपचार करण्यात आले.

सदर शिबिरात कपिंग थेरपिस्ट व शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा.प्रितम ओव्हाळ यांनी सहभागी कर्मचाऱ्यांचे निदान व उपचार केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे कर्मचारी कल्याण विभागाच्या प्रमुख डॉ.सुवर्णा खोडदे व शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ.सचिनकुमार शाह, डॉ.उल्हास लंगोटे, डॉ.अण्णासाहेब निंबाळकर, प्रा.प्रशांत शिंदे , प्रा.संदीप व्यास आदी मान्यवर उपस्थित होते.

## जैन पर्यूषण पर्व, दशलक्षण धर्म लेखमाला पर्यूषण पर्व : दशलक्षण धर्म

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय संस्कृतीमध्ये आध्यात्मिक आचार विचार प्रवृत्तींना महत्त्वाचे स्थान आहे. त्यानुसार भारतीय धर्म संप्रदायामध्ये अनेक प्रकारचे आध्यात्मिक पर्वकाळ येतात. जैन धर्मामध्ये प्रामुख्याने सर्वाधिक महत्त्वाचे पर्व पर्यूषण पर्व हे मानले जाते.

दिगंबर जैन संप्रदायानुसार भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील ऋषिपंचमी ते भाद्रपद पौर्णिमा असा हा दहा दिवसांचा पर्व काळ असतो. आत्मधर्माच्या आचार आणि विचारासाठी हाच काळ उत्कृष्ट मानला गेला आहे. कारण आराधने साठी या काळात हवामान समशीतोष्ण असते. भारतीय संस्कृतीत नांदणाऱ्या सर्व धर्मामध्ये याच काळामध्ये अनेक प्रकारची व्रतं केली जातात. यामध्ये आत्मसमृद्धीच्या दृष्टीने आत्म्याच्या स्वभावाचा विचार केला जातो. जैन धर्मानुसार आत्म्याचे दहा प्रमुख स्वभाव लक्षण विश्लेषित केले आहेत. म्हणून या पर्व काळाला दशलक्षण धर्म असे ही म्हटले जाते. धर्म म्हणजे पदार्थाचा मूळ स्वभाव. जगातील सर्व पदार्थ आपला स्वभाव कधीही सोडत नाहीत. आत्म्याच्या सर्वोत्कृष्ट स्वरूपातील प्राप्तीसाठी त्याचे मूळ लक्षण स्वभाव जाणणे आवश्यक ठरते. आत्म्याच्या मूळ दहा स्वभाव लक्षणांचा विचार आणि आचार यात गृहीत आहे. हे दशधर्म आत्म लक्षणं उत्तम क्षमा, मार्दव, आर्जव, शौच शुचिता, सत्य, संयम, तप, त्याग, आकींचन्य व ब्रह्मचर्य असे मानले आहेत. या लेखमाले मध्ये आपण क्रमाने यातील प्रत्येक आत्म धर्माचे विचार विश्लेषण करणार आहोत.



### जैन पर्यूषण पर्व 2025

*भाद्रपद शुक्ला पंचमी, ऋषिपंचमी {दिनांक २८ ऑगस्ट}*

### प्रथम आत्मधर्म : उत्तम क्षमा

आत्म्यामध्ये क्रोध अर्थात् रागाच्या अभाव रूप शांती स्वरूप अवस्था उत्पन्न होणे यास उत्तम क्षमा असे म्हटले आहे. क्रोध किंवा रागास अग्नीची उपमा दिली जाते.

क्रोधोदयात भवती कस्य न कार्य हानी -
अर्थात् क्रोध मुळे सर्व प्रकारच्या कार्याची हानी होते. त्यास शांत करण्यासाठी क्षमा रुपी शांती जल हेच समर्थ आहे. ज्या प्रमाणे जलाचा मूळ स्वभाव शितलता आहे, त्याच प्रमाणे आत्म्याचा जीवाचा मूळ स्वभाव शांती हा आहे. हा स्वभाव क्षमेने प्रकट होतो. क्रोधाने अंध व्यक्ती स्वतःचे आणि त्या सह दुसऱ्याचे ही मोठे नुकसान करतो. क्षमा ही अत्यंत उदार आणि व्यापक अशा हृदयामध्ये वास्तव्य करते. चंदन स्वतः झिजून सुगंध, शीतलता देते. क्षमा संयम आणि सहनशीलतेने विकसित होते.

क्षमा वीरस्य भूषणम - अर्थात क्षमा हे वीरांचे भूषण आहे. क्षमाशील स्वभावानेच शूरवीर देखील महान गणले जातात. स्वार्था मुळे स्वभावात क्रोध, मान, माया, लोभ हे कषाय म्हणजेच आत्मशत्रू उत्पन्न होतात. अशा अवस्थेमध्ये द्वेष युक्त क्रिया कर्मानि आत्म्याचे मोठे नुकसान होऊन तो संसारामध्ये परत परिभ्रमण करतो. मुक्ती पासून दूर जातो. आणि व्यवहारातही अस्थिरता निर्माण होते. म्हणून क्षमाशीलता धारण करणे आत्म्याच्या उत्कर्षासाठी, शांतीपूर्ण प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून उत्तम क्षमा हाच आजच्या दशलक्षण धर्मातील प्रथम प्रमुख विचार आहे.

बलराज संघई, छत्रपती संभाजीनगर. 94200 15108

ऑनलाईन औषधोपचार

आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# आधी वंदू तूज मोरया...

## प्राचीन गणपती मंदिर...''पद्मालय''

**ज्योतिर्मय साहित्य**

जळगांव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यात श्री क्षेत्र पद्मालय हे गणपती देवस्थान निसर्गरम्य परिसर असलेल्या एका सुंदर तळ्याकाठी वसलेले आहे.प्राचीन काळातील हे मंदिर आहे.त्यावेळेस येथे घनदाट अरण्य असावे.

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी उजव्या सोंडेचा आणिक डाव्या सोंडेचा असे दोन स्वयंभू गणपती एकाच सिंहासनावर आहेत. प्रवाळ रत्नापासून बनलेल्या या आकर्षक गणेश मूर्ती अतिशय जागृत असल्याची भाविकांची श्रद्धा असल्याने वर्षभर दर्शनासाठी भाविकांची गर्दी या ठिकाणी असते.संकष्टी, व विनायकी चतुर्थीला विशेष गर्दी असते. दर्शनासाठी दोनदोन, तीनतीन तासही लागतात.

पद्मालय नावाचं गाव अस्तित्वात नाही मात्र आजूबाजूचा परिसर याच मंदिराचे नावाने ओळखला जातो.

जळगाव पासून ३० किलोमीटर आणि एरंडोल पासून १२ किलोमीटर अंतरावर हे स्थान असून एसटी बस अथवा खाजगी वाहनाने या क्षेत्री आपण येऊ शकतो. मध्य रेल्वेच्या भुसावळ-मुंबई रेल्वे मार्गावरील म्हसावद रेल्वे स्थानकापासून आठ किलोमीटर अंतरावर हे स्थान आहे. जळगावहून म्हसावद मार्गे आल्यास डोंगरमाथ्यावर थोड्याश्या चढणीच्या रस्त्याने पुढे आल्यावर श्री गणेश मंदिराच्या कळसाचे लांबूनच दर्शन घडते. मंदिराच्या अगदी समोरच शेकडो लाल , पांढऱ्या कमळांनी बहरलेला सुंदर तलाव आहे. 'पद्म' म्हणजे कमळ आणि 'आलय' म्हणजे घर यावरून या स्थानाला पद्मालय हे नाव पडले असावे. मंदिराच्या दोन दिशांना तळ्यात उतरणाऱ्या पायऱ्या असलेला दगडी घाट बांधलेला दिसतो . मंदिरावर ९० फुटी उंच कळस आहे. मुख्य कळसाभवती आठ छोटे उप-कळस असून दगडी कळसावर यक्ष, किन्नर आणि वीणा वादन करणाऱ्या नारदमुनीं यांच्या मूर्ती आहेत. सभामंडपाच्या प्रवेशद्वाराच्या वर दोन भल्या मोठ्या हातींचें शिल्प आहे .मंदिराचे समोरच वजनदार अशी पंचधातूची घंटा आहे.तिचा आवाज १५ किलोमिटर पर्यत ऐकायला येतोअसे म्हणतात .ही काशीला घडवली व ''प्रवाळ क्षेत्र वासीने धरणी धराय नमः'' असा मजकूर आहे.

गोविंद शास्त्री बर्वे हे सिद्ध पुरुष होते.१८९५ ते १९३५ काळात त्यांचे वास्तव्य तिथे होते.त्यांनीच मंदिराचा जीर्णोद्धार केला.त्यांच्या पादुका येथे आहेत.

संपूर्ण काळ्या पाषाणात बांधकाम असलेले हे मंदिर पूर्वाभिमुख असून अतिशय सुंदर असेच आहे. मंदिर परिसरातील इतर वास्तूंचे बांधकामही काळ्या पाषाणातूनच केलेले असल्याचे दिसून येते. मुख्य देवालयाच्या चहूबाजूस गणपतीची छोटीछोटी देवळे आहेत .

मंदिराच्या प्रवेशद्वारा बाहेरील परिसरात पूजासाहित्य,नाश्ता, भोजन व्यवस्था असलेली असंख्य छोटीछोटी दुकाने थाटलेली असतात.



एका भव्य दगडी कमानीखालून आपण मंदिर परिसरात प्रवेश करू शकतो. तलावाकाठी असलेल्या पायवाटेवरून थोडं पुढे गेल्यावर मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला एक सव्वा तीन फूट व्यासाचे अवाढव्य दगडी जाते दिसून येते. पूर्वीच्या काळी धान्य दळण्यासाठी अशा प्रकारच्या लहान जात्यांचा वापर घराघरात होत असे. येथे असलेल्या जात्यास त्याच्या मोठ्या आकारावरून 'भिमाचे जाते' म्हणून संबोधले जाते. मंदिर जीर्णोद्धाराच्या काळात या जात्यास दोन बैल जुंपून गोल फिरवून धान्याचे बारीक पीठ केले जायचे . त्याकाळी हजारो लोकांसाठी महाप्रसादची व्यवस्था या जात्यातून निघालेल्या पिठापासून तयार केली जायची. अशीही माहिती आहे.

मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर मुख्य गाभाऱ्यात डाव्या सोंडेचा आणि उजव्या सोंडेचा असे दोन गणपतींचे दर्शन होते . चांदीचे मुकुट धारण केलेल्या या मूर्तींवर दररोज जास्वंद आणि कमळांच्या फुलांची आरास केली जाते. मूर्तींमागे चांदीची प्रभावळ आहे गाभाऱ्यात चांदीचे खांब असलेल्या मखरावर रिद्धिसिद्धिच्या मूर्ती आहेत. संपूर्ण जगात श्री क्षेत्र पद्मालय हे असे तीर्थक्षेत्र आहे जेथे प्रवाळरत्न स्वरूपात प्रकट झालेले डाव्या आणि उजव्या सोंडेचे असे दोन स्वयंभू गणपती एकाच सिंहासनावर आरूढ झालेले आहेत. मंदिरातील या दोन गणेश मूर्ती पैकी एक सहस्त्रअर्जुनाने आणि दुसरी श्रीशेषाने स्थापन केल्याचा उल्लेख श्रीगणेश पुराणातील उपासना खंडात आढळतो.

गणेश चतुर्थी आणि कार्तिक पौर्णिमेला या तीर्थक्षेत्री मोठी यात्रा भरते. या पुण्यपर्वात हज्जारो भाविक दर्शनासाठी पद्मालय येथे येतात. माघ शुद्ध चतुर्थीला गणेश जन्मोत्सवही थाटात साजरा करण्यात येतो. नवसाला पावणारा गणपती असल्याची भविकांची श्रद्धा असल्याने येथे दर्शनासाठी भाविकांच्या मोठ्या रांगा लागतात. या स्थानाचे महत्व जाणून थोरले माधवराव पेशव्यांनी मंदिराच्या व्यवस्थापनासाठी खान्देश सुभ्यातील ३७ परगण्यांचा निम्मा महसूल पद्मालय देवस्थानास दिला होता . पद्मालय मंदिर संस्थानाला पेशव्यांची सनद मिळाली असल्याने हे देवस्थान अतिशय पुरातन असल्याचे लक्षात येते व खात्री पटते. मुख्य मंदिराच्या भोवती चार दिशांना श्री गणेशाची मंदिरे आहेत.




मंदिरा पासुन एक किलोमीटर अंतरावर एका खोल दरीत असलेले भीमकुंड आहे. पर्यटक येथे आवर्जून भेट देतात. पांडव अज्ञात वासात असतांना भीम आणि बकासुर राक्षसाचे युद्ध येथे झाल्याची आख्यायिका सांगितली जाते. युद्धात बकासुर मारला गेल्यानंतर तहान लागल्यावर भीमाने खडकावर प्रहार करून खड्डा निर्माण केला. त्यातून वर आलेले पाणी प्राशन करून भिमाने आपली तहान भागवली होती, ते भीम कुंड आज देखील या ठिकाणी पाहायला मिळते.

भारताचा राष्ट्रीय पक्षी म्हणून मान्यता मिळालेल्या मोरही दिसतात. पावसाळ्याच्या सुरुवातीला मोराने फुलवलेला पिसारा बघण्यासाठी अनेक जण मुद्दाम येथे येतात .

अश्या ह्या निसर्गरम्य ,आणि जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या पद्मालयाला एकदातरी गणपती दर्शन घ्यावे. नक्कीच मन आनंदाने, समाधानाने भरुन पावेल.

## गणेश महात्म्य

**ज्योतिर्मय साहित्य**

गणांचा ईश म्हणजे गणेश. जो समूह मनांचा देव आहे. म्हणूनच कोणत्याही कार्यारंभी श्री गणेशाचे पूजन करण्याची परंपरा आपणाकडे आजही कायम आहे. मानवी मनाच्या भावपूर्ण आशा आकांक्षांना, मनातील भावभावनांना, श्रद्धातून निर्माण झालेला हा पहिला अंकुर आहे. अरुपाला पडलेले रूप रसगंधाचे ''प्रथमेश'' हे पहाटे पडलेले सुंदर स्वप्न आहे. विहंगाच्या कोवळ्या सुमधुर कुंजण्याच्या वेळी, जात्यावर दळता दळता म्हणताना लोक कवयित्रीने आपल्या पहिल्या ओळी ओवीचे फुल भक्तिभावाने गणेशाच्या चरणी अर्पण केलेले आहे. गणपती हा बुद्धीचा दायक व सिद्धीचा नायक आणि विघ्नांचा विनायक आहे. अनेक कवी लेखक कलावंतांनाही गणेश हा जीवनातील सत्य शिव सुंदरतेचे अधिष्ठान असल्याचं आपल्या काव्यातून ज्याचा सुंदर वर्णन केलेला आहे त्यामुळेच गणेश उपासनेला खूप मोठे महत्त्व प्राप्त झालेलं आहे.

पुराण काळापासून गणेशाची उपासना आपल्या सण उत्सव मंगल कार्यामधून प्रथमता करण्याची परंपरा आजही सुरू आहे. मराठी मनामनात गणेश देवतेला खूप मोठे मानाचे स्थान दिलेलं आहे. म्हणूनच महादेवाची आराधना भक्ती भावाने करणाऱ्या मराठी भाविकांनी त्याच्या पुत्रास श्री गणेशास मस्तकी धारण करत उत्सवाच्या निमित्ताने गणेशमय होऊन जातात. साऱ्या महाराष्ट्रातील घराघरामधून गणेश विराजमान झालेला नी त्याच्या हृदय सिंहासनावर भक्ती भावाने आरुढ झालेला आहे. त्यामधून हजारो भक्तांनी अत्यंत भक्तिभावाने गावागावा मधून अनेक देवर गणेश देवतांचे मंदिरे देखील उभी केलेली आपणास पहावयास मिळतात.





सुधीर कोर्टीकर
मो.९७६५५५३३१२


गणेश पुराण मुद्गल पुराणातूनही गणेशाच्या पराक्रमाच्या कथा खूप सुंदर शब्दातून सांगितलेले आहेत त्याचप्रमाणे या गजाननाच्या प्रत्येक स्थानाचे महत्त्व सुरेख शब्दातून विशद केलेलं आहे सर्वात आनंदाची गोष्ट गणपतीची ही तीर्थस्थाना, अष्टविनायक मंदिर महाराष्ट्र मध्येच आहेत व्यास ऋषीने १८ मूळ पुराणाची रचना संस्कृत मध्ये केलेली आहे त्यापैकी एक असणारे गणेश पुराण व्यासाचे शिष्य ऋषी यांनी हे पुरण शौनक ऋषी व त्यांच्या शिष्यांना सांगितले नंतर हे गणेश पुराण त्यांच्या माध्यमातून आपणा सर्वांना पोहोच पोहोचले प्रत्येक गणेश भक्ताने गणेश जयंती किंवा संकट चतुर्थी गणेशाची मनोभावे पूजे पूजा आर्च करून गणेश कथनाचे वाचन करावे हीच त्या गणेश महात्म्याची फलश्रुती आहे





असंच म्हणावं लागेल.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559